MHBI110030322024

## नियमित दिवाणी दावा क्रमांक ७१७/२०२४ मधील
## निशाणी क्र. १२ खालील आदेश

१. वादीने सदरचा दावा हा दावा प्रतिवादी क्र. १ ते ५ विरुद्ध मालकी हक्क जाहीर होवून वादग्रस्त मिळकतीचा ताबा मिळून हददबंदी मोजणीकरीता दाखल केला आहे. या दाव्यात प्रतिवादी क्र.१ ते ५ विरुद्ध दि.०५/०२/२०२५ रोजी "कैफियत नाहीचा" आदेश पारित झाला आहे. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी त्यांच्या विरुद्ध झालेला कैफियत नाहीचा आदेश  रद्द करण्यात यावा याकरीता केलेला आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले.

२. प्रतिवादींच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, १, ४ व ५ हे वयोवृध्द असल्याने सतत आजारी असतात तसेच प्रतिवादी क्र.२ व ३ हे पोट भरण्यासाठी बाहेरगावी गेले होते, त्यामुळे प्रतिवादींनी मुदतीत त्यांची कैफियत दाखल केली नाही. सबब, अर्ज मंजूर करण्यात यावा.

३. वादीच्या वकीलांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादींना सदर अर्ज देण्यास एक वर्ष विलंब झालेला असून अर्जातील कारण योग्य नाही. तसेच प्रतिवादींनी जाणूनबुजून उशिर केलेला आहे. सबब, अर्ज नामंजुर करण्यात यावा.

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.16 17:21:11 +0530

४. अर्ज पाहिला. अर्जातील कथने पाहिली. सदरचा दावा सध्या वादीच्या पुराव्यावर प्रलंबित आहे. मात्र अद्याप पुरावा देण्यात आलेला नाही. दाव्याचे स्वरुप आणि वादीची मागणी पाहता प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे म्हणणे अभिलेखावर येणे गरजेचे दिसते. सबब, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून पुढील अंतिम आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज **नि.१२** मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वादीला आजच्या अथवा पुढील तारखेस रक्कम रु.५००/- इतकी खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर, त्याच्या विरुद्ध झालेला विना कैयफियतीचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर कैफियत त्वरीत दाखल करावी व दाखल केलेली असल्यास ती वाचून दाखल करावी.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.16 17:21:15 +0530

**(श्रुती ह. पाटील )**

**दि. १६/०४/२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई.**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 16.04.2026 |
| Transcribed on | :- | 16.04.2026 |
| Checked & Signed on | :- | 16.04.2026 |

Sd/-
(P.B. Kusumkar)
Stenographer, Georai.